म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा
दा. क्र. २५२४

२५२४

बापू

IRBK-0102524
IRBK-0102524

ग्रं. सं. ठाणे

चालू

किंमत ३॥ आणे

भारत प्रकाशन संस्था

दी. क्र. २५२७

हें पुस्तक सरकारनें प्राथमिक शाळांतील लायब्र-यांसाठीं मंजूर केलें आहे.

बाल-वाङ्मयमाला २७

नोंद २५२८
वाच ३०२.

बाबू

म. अं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २५२६ नों. दि ....
वि. बा. वा. ... क्र. ....

: लेखक :

तु. ता. सावंत, एस्. टी. सी.; साहित्यविशारद
हिन्दी-कोविद

IRBK-0102524

प्रकाशक—

नवभारत प्रकाशन संस्था मुंबई, ४.

: प्रकाशक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन संस्था,–मुंबई ४.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति जून १९४३
द्वितीयावृत्ति जून १९४४
पुनर्मुद्रण जून १९४६

: मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी गिरगांव, मुंबई नं. ४

वाचा. ८१

२५१२७ ११७०३

घरीं

[१]

टिर्र्र्र्र्र्ऽऽ

घड्याळताईनें घंटी दिली. आई जागी झाली. बाबू जागा झाला. मी कशाला उठूं ? बाहेर पावसोबाचा ' धो धो ' धिंगाणा चालला होता. वारोबा सों सों सणाणा करीत होता. काळें कांबळें पांघरून काळोखोबा अजून बाहेर उभा होता. थंडीबाई आंत येत होती. पांघरुणांतून मीं हळुच पाहिलें—

आई शेगडींत कोळसे टाकीत होती. बाबू बडबडत होता—

" थेगलीबाई—कोलथे खाई "

" मी पिंपांतले कोलथे कालतों. "

बाबू पिंपाच्या कांठावर चढला. आंत वांकला. ' टप् ' आवाज झाला. आई धांवली. बाबू कुठें दिसेना. पिंपांतून शब्द आला—

" आई आई, पलों—पलों "

आईनें बाबूला बाहेर काढला. मी म्हणालों—

" काळोबा रे काळोबा—बाबू बनला वानरोबा "

" इथं गप्प बैस. " असें म्हणून आई बाहेर गेली. बाबू शेगडीजवळ बसला. आगीच्या ठिणग्या—बसेनात उग्या. बाबू बोलला—

" आग थमकते--थिन्‌थिन कलते. "

[२]

बाबू उठला--त्यानें मोठ्या बरणींत हात घातला.

" दांत धातूं--आमी बतूं. "

आई आली--" ती म्हणाली बाबू, काय कर-

तोस ? बघूं कशानं दांत घासतोस तें ? अरे वेड्या,
चहाच्या पावडरनं दांत घासतात का कधीं कुणी ?"

"मी—मी धात्तों !"

"तूं आहेस वेडा !"

"मी नाहीं वेला, दादा वेला. मी श्याना."

"जा तुझ्या दादाला उठव."

बाबू मला उठवूं लागला.

"ऊठ ऊठ दादा—कलूंया मदा"

बाबू माझें पांघरूण ओढूं लागला. पांघरूण सुटलें. बाबू पडला. बाबूनें घेतली काठी—बाबू मला लाटी.

"दादा आलथी—दादाची माऊ मावथी."

मी म्हणालों,

"तो बघ काऊ—तो तुझा भाऊ!" आई बोलली,

"दादा रे दादा, आंघोळ कर. बाबूला आंघोळ घाल."

"मी नाहीं आंघोळ घालणार त्याला."

बाबू आला. मला बिलगला. बोलूं लागला—

तूं माझा दादा ना? तूं माझा भाऊ. आमी दोघे न्हाऊं."

मी बोललों.

"मग घे बादली अक्का—घे तांब्या भाऊ—घे साबणसाहेब—चल मोरींत."

[३]

बाबू गेला मोरींत. हात घातला बादलींत. बाबूचा हात भाजला. तो लागला नाचायला. मी म्हणालों—

"तुला समजत नाहीं मग कशाला करतोस घाई?"
मग आमच्या आंघोळीला सुरवात झाली. बाबूनें माझ्या डोकीवर पाणी ओतलें. मी त्याच्या डोकीवर ओतलें.

" हा साबण धरा
घासा झरझरा
फेस भरभरा
बाबू झाला गोरा. "

" गरम गरम पाणी—आंघोळ करी माझा चक्रपाणी " बाबू बोलला—

" गलम गलंम पानी—आंदोल कली दादाची नानी. "

मी बाबूवर रागावलों. साबण फासला बाबूच्या डोळ्यांला. बाबू लागला रडायला.

मी म्हणाला—

" कसं काय बाबू—कसा आहे साबू ?

बाबू उठला. डोकें खालीं केलें. बादलींत बुडवलें. आणखी बुडवलें. आणखी बुडवलें. डोकें गेलें खालीं—पाय झाले वर आणि लागला डुबुक् डुबुक् करायला !

आई धांवत आली. तिनें बादली बाजूला केली. बाबूची डोकी पुसली.

बाबूचे डोळे लाल झाले होते—नाक लाल झालें—तोंड लाल झालें. एवढें सगळें साबणानें केलें.

[४]

बाबूची आंघोळ झाली. माझी आंघोळ झाली. बाबूनें टॉवेलानें अंग पुसलें, मीं टॉवेलानें अंग पुसलें.

मी बोललों—" टॉवेलभाई—माझं अंग पुस घाई घाई—" बाबू बोलला--" टॉवेलबाई--नतो पुतूं धाई धाई !"

मी केंस विंचरीत होतों. इतक्यांत बाबू ओरडायला लागला--

" आई ! आई ! आई ! "

" बाई--बाई--बाई ! काय झालं रे "

आईनें पाहिलें--मीं पाहिलें--बाबूचें डोकें तेलानें माखलेलें. जमिनीवर तेल सांडलेलें.

" अरे सगळं तेल सांडलंस--बूच हरवलंस --अंग मळवलंस. जा, केंस विंचर जा. "

मग बाबू जाईना. धप्धप् धपाटे--बाबूला सपाटे. त्याला मी जवळ घेतला. चांगला पुसला. केंसांचा भांग पाडला. पुनः तो आंत पळाला. थोड्या वेळानें पुनः

" आई ! आई ! आई ! ! "

" काय झालं रे तुला. उगीच ओरडतोस कशाला ? "

मीं आंत पाहिलें. बाबूचे केंस पांढरे—तोंड पांढरें—सगळें अंग पांढरें.

" एवढासा चिमुरडा–' पावडर ' लावणारा केवढा ! कशाला हें पीठ—चल लावतें तीट. "

पण बाबू कसला धीट ! तो पळाला. चुलीजवळ गेला. बोट फासलें चुलीला. काळें लावलें कपाळाला. धांवत धांवत आला—

" आतां मी कथा दित्तों ? "

" चांगलं बरं माझं बाळ—जा आतां खेळ. " आईनें त्याचा मुका घेतला. बाबू हंसला.

" मला दुद्दू हवं ! "

" चल. हा कप तुला. हा दादाला. "
" दादाला नतो देऊं. "
" असं काय ! तो दादा ना ? "
" हं हं ! तो भाऊ. "

[५]

मी दूध प्यायला बसलों.
" बाबू, मी जादू करून दाखवूं ! "
" हं ! "
" पहा, जादूनं कपांतलं दूध नाहींसं करतों. "
" हं कल बघूं ? "
" डोळे मीट. "
बाबूनें डोळे मिटले.
" म्हण—माऊ माऊ ये. "
" माऊ—माऊ ये. "
" हा खाऊ घे. "
" हा थाऊ घे. "
" दूध पिऊन जा. "
" दूध पिऊन ज्या. "

मी कप उचलला—तोंडाला लावला—रिकामा केला—खालीं ठेवला.

" बाबू , आतां उघड डोळे—माऊ पळालें. " दूध नाहींसें झालें.

बाबूनें डोळे उघडले. कपाकडे पाहिलें. अरे बाप रे ! किती रागावला माझा बाबू ! त्यानें कप उचलला—जोरानें फेंकला—कपाला कप लागला. खळ्ळ्ळ्! दुधाचा पाट लागला वाहायला. आणि कपाचे तुकडे तुकडे झाले. आईनें पाहिलें. एवढाले एवढाले डोळे केले.

आणि ती म्हणाली—

" काय हें केलंस–दूध सांडलंस–कप फोडलेस."

" मी नाई. "

" आई, यानंच ग ! "

" दादा, खोत्तं थांगतो. "

" बोबडा बाबू—पक्का खाबू. "

" मी अतूं दे बोबला—तूं तोंबला. "

" गप्प बसा आतां—खेळा जा. "

" मला दुदू पायदे. "

" हा लाडू घे. खेळा दोघे. "

[६]

मी बसलों अभ्यासाला. बाबू लागला खेळायला. खेळतां खेळतां माझ्याजवळ आला. मला बोलला—

" दादा, दादा—
तूं माझा भाऊ.
लाळू मोळून
दोघांनीं खाऊ. "

" इकडे आण तो लाडू—मी करतों जादू. "
" नतो काई ! "

" कां "

" आई लागवेल ना. मला मालील ना. "

" मग तूं जा. एकटाच लाडू खा. "

" मला पुस्तक दे—हा लाडू घे. "

बाबूनें पुस्तक घेतलें. त्यांतलें एक चित्र काढलें. चित्र होतें बोकडाचें—बाबूच्या आवडीचें. फारच मौजेचें.

" कोण तो, बाबू ? "

" दादा. "

" हट चावट ? "

" मद थांगूं ? "

" हं ! सांग ! "

" मादा भाऊ. "

असें म्हणून बाबू आंत पळाला. आईजवळ बसला.

[७]

मी खूप रागावलों—चडफडलों. गप्प बसलों. अभ्यासांत गढून गेलों—बाबूला अगदीं विसरून

गेलों. मन लावून पुस्तीला बसलों. आणि पुस्ती झाल्यावर उठलों. पहातों तों काय—

माझ्या सदऱ्याला—मागच्या बाजूला—दोरा बांधलेला.

" बाबू हसत, नाचत ओरडत होता.

" दादा वानल ! हुप् ! हुप् ! ! "

दादा वानल हुप् ! हुप् !

बाबू कसला वात्रट—मला बांधलें त्यानें शेंपूट. मीं बाबूला धरला. त्याचा गालगुच्चा घेतला. बाबू बोलला—

" माल—माल—माल. "

बाबू लहान त्याला कसा मारूं ? सोडून दिला.

थोड्या वेळानें बाबू दारावर आला—बोलला—

" माम खायला कोन येतो ? "

मला वाटलें, आईनें जेवायला वाढलें असेल म्हणून मी पुस्तकें ब्यागेंत भरलीं. आणि जेवायला गेलों.

मला पाहून बाबू नाचूं लागला. ओरडूं लागला.

" फतवलं ! फतवलं ! एका बापल्याला फतवलं ! ! "

आईनें जेवायला वाढलें नव्हतें. मी हिरमुसला झालों. परत फिरलों. थोड्या वेळानें आईनेंच जेवायला बोलावलें.

[८]

जेवायला गेलों. पाहिलें तों—एकच ताट—एकच पाट त्यावर बसला बाबू ताठ. तो उठेना कीं हालेना.

मी बोललों—" बाबू, जादू करूं या. "

" मी कलतों द्यादू. "

" कर जादू. "

" दोले मित " मीं डोळे. मिटले. कांहीं तरी हाललें. बाहेरून शब्द आला—" दोले उघल "

मीं डोळे उघडले. पाटावर बाबू नव्हता. मी पाटावर बसलों, जेवायला सुरवात केली. जेवण उरकून बाहेर आलों. पुस्तकें घेतलीं—पण पुस्ती सांपडेना.

" बाबू, पुस्ती कुठं आहे ? "

बाबू ' ओ ' देईना. आंत गेलों. बाबू बादली-

जवळ उभा होता. बादलींतल्या पाण्यांत होडी तरंगत होती. " बाबू, काय हें ? "

" होली. "

बाबूची झाली होडी—पण माझी खैरमोडी.

दुसरी पुस्ती काढायला बसलों. पुस्ती संपली. बाबूनें हांक मारली.

" दादा, बघा माझी मदा. ही मादी तोपी— हें माधें थमीस—आतां मी दातों थालेंत. "

बाबूनें माझे कपडे आपण घातले होते. मी कपडे हिसकावून घेतले. अंगांत घातले.—रामाबरोबर शाळेंत निघालों. ग्यालरींतून बाबू ओरडत होता —दादा, लवतल ये—मला थाऊ घेऊन ये. ”

शाळेंत

[१]

मी शाळेंत गेलों.

शाळेंत लहान लहान मुलें दिसलीं—बाबूची आठवण झाली.

मास्तरांनीं पुस्ती तपासली—बाबूची आठवण झाली.

दुपारची शाळा सुटली. मग मी माझी चपाती सोडली.

बाबूची आठवण झाली.

संध्याकाळीं शाळा सुटायला पांच मिनिटें होतीं. कोणीतरी लहान मुलगा ‘ दादा—दादा ’ म्हणत

आमच्या वर्गांत आला. बाबूच होता तो. रामा-बरोबर आला होता मला घरीं न्यायला.

बाबू सरळ माझ्याजवळ आला. मला बोलला—
" चल ले दादा घलीं. "

सगळीं मुलें हंसलीं. खूप खूप हंसलीं. बाबू कावराबावरा झाला—त्यानें अस्से अस्से डोळे केले—अस्सें वर्गाकडे पाहिलें. कोणीतरी म्हणालें—

" बाबू बट्टू बट्टू—चालतो लुटुलुटू—बोलतो पुटुपुटू. " बाबू बोलला—" च्यल घलीं. "

मास्तर बोलले—बाबू, इकडे ये. "

बाबू, बोलला—" दादा, तल घलीं. ".

त्यानें माझी बॅग उचलली. माझा हात धरला. चालूं लागला. ब्याग झाली जड—बाबूची धडपड. मास्तरांनीं मला जायला सांगितलें. आम्ही वर्गा-बाहेर पडलों. कोणीतरी मुलगा म्हणाला—

" छोटा बाबू बट्टू बट्टू—चालतो लुटुलुटू—बोलतो पुटुपुटू. "

बागेंत

आम्ही घरीं गेलों.

आईनें मला दूध दिलें—शिरा दिला. बाबू बोलला—

" दादा, मादा वाता अल्दा. " मी म्हणालों, मी खातों खा--तूं खा हवा. " आतां आपण बागेंत जाऊं. " रामाबरोबर बागेंत गेलों. छोटींमोठीं--काळीं गोरीं—मुलें जमलीं. खेळूं लागलीं.

इतक्यांत एक कुत्रा आला. आमच्या पुढ्यांत उभा राहिला. खालीं बसला. बाबू पुढें सरला. बाबूनें कुत्र्याला हात लावला. गरीब बिचारा कुत्रा कांहींच करीना.

बाबू समजला. कुत्रा गरीब आहे. तो कुत्र्याच्या मागें उभा राहिला. त्यानें एका हातानें कुत्र्याच्या गळ्यांतला पट्टा पकडला. आणि तो कुत्र्याच्या पाठीवर स्वार झाला.

कुत्रा हिरव्या गवतावरून धूम पळत सुटला.

पुरुष जमले—बायका जमल्या—मुलगे धांवत आले. मुली पळत आल्या. सगळीं पाहूं लागलीं.

पुरुष म्हणाले—" वारे वीर ! "

बायका म्हणाल्या—" खरा खंबीर ! "

मुलें म्हणालीं—" जसा कांहीं वीर ! "

रामा धांवला—मी धांवलों. कुत्र्याला अडवला. बाबू खालीं पडला. कुत्रा पळाला. बाबू बोलला—" मादा घोला पलाला. "

बाबू खरचटला. रामा घाबरला.

पुनः घरीं

आम्ही घरीं आलों.

बाबा वाचीत बसले होते.

आई जेवण करीत होती.

मी ग्यालरींत बसलों. बाबू माझ्या शेजारीं बसला. मीं उजळणी म्हणायला सुरुवात केली.

" एक पाव पाव—"

" पैत्याता पाव—दोघांनीं खाव. "

" गप बैस. मी उजळणी म्हणतों आहें—एक पाव पाव. "

" पाव कत्याला ? "

" मग काय म्हणूं ? "

" बिक्कीत. "

" बिस्कीटाची उजळणी आहे का ? "

" हं ! "

" कुठं ? "

" आमत्या घर्लीं—बल्नींत. "

" तूं बोलूं नकोस. "

" तूं बोलूं नतो, मला थिकव. "

" काय ? "

" गानं ! "

" म्हण, आमचा बाबू—पक्का खाबू. "

" तथलं नतो. "

" नको तसलं—मग कसलं ? "

" गोत्त थांग. "

" ऐक—एक होता मुलगा. खूप, खूप गोरा, खूप खूप चांगला.

हसायचा हुडहुड
नाचायचा दुडदुड
खेळायचा मुडमुड
बोलायचा लुडबुड

भाताला म्हणायचा माम्. पाण्याला म्हणायचा पा.

" नांव ताय त्याचं ? "

" त्याचं नांव बाबू ? "

" त्यात्तं नांव दादू. "

अभ्यास झाला. जेवण झालं. झोंपण्यासाठीं मी व बाबू पलंगावर चढलों.

बाबू बोलला—

" मी आईजवळ धोपनाल ! "

" मी आईजवळ धोपनाल ! "

मी म्हणालों नाहीं, इथेंच झोपलं पाहिजे.

आई म्हणाली,

" निजूं दे रे बाळाला माझ्याजवळ. "

" आई तो तुझा आणि मी कुणाचा ? "

मीं डोळे पुसले. बाबूला वाटलें—मी रडतों, तो आईला म्हणाला—

“ आई, दादा आमता ना ? त्याला घेना जवळ.”

आईनें मला जवळ घेतलें.

आईला आनंद झाला.

बाबूला आनंद झाला.

आतां मी आणि माझा बाबू खेळतों, उड्या मारतों, नाचतों, मजा करितों.

माझा भाऊ बाबू आणि

बाबूचा भाऊ मी

मला बाबूनें—‘ दादा, ले दादा, अशी हांक मारली आणि मी बाबू रे बाबू अशी हांक मारली कीं किती आनंद होतो—अगदीं सांगून समजणार नाहीं कुणाला !

आम्ही दोघे आनंदी आनंद करितों तसा आनंद तुम्हांला पण होऊं द्या बरं.

होईल ना आनंद ?

म्हणा ‘ हं ’ असें

नवभारत प्रकाशन : बालवाङ्मय

कु. अनसूया काटदरे

नशीबवान् मुलगा ०-४-६

माधव केशव काटदरे

डोंगरांतला काका ०-४-६

पऱ्यांची देणगी ०-४-६

सांजवातीचे वेळीं ०-३-०

गाढव जांवई ०-४-०

शालिवाहनाची कथा ०-३-०

सोनसांखळी ०-६-०

तिघे प्रवासी ०-३-०

गोड गीत (कवि माधव) ०-४-०

तीन रणयोद्धे ०-४-६

तीन लढाऊ प्राणी ०-४-६

ग. पां. परचुरे

मैत्रिणी ०-४-०

वि. स. गवाणकर

रामायण महाभारतांतील सुरस गोष्टी ०-४-६

महाराष्ट्राच्या इ. सु. गोष्टी ०-३-०

जगाचा जन्म ०-६-०

जोडाक्षर-विरहित

काळा-काका ०-३-६

गमती-जमती ०-३-६

उंदीर-नवरा ०-३-६

खेड्यांतील जमती ०-३-६

बाळ ओझरकर

पंच कन्या ०-४-६

पांच बाळें ०-४-६

तु. ता. सावंत

बापू ०-३-६

पु. वा. कुळकर्णी

मुलें पळविणारी टोळी ! ०-४-०

ल. वा. भावे

सुबोध संवाद ०-६-०

अ. दा. अत्तार

सोपा भूगोल (इ. २ री) ०-४-०

सौ. प्रभावती जोशी

चलाख परीट व चार चोर ०-६-०

सौ. प्र. जोशी, भालचंद्र गो. जो

रत्नमाला ०-६

चन्द्र दूत ०-८-०

सौ. विमलाबाई द. मराठे

लांबनाक्या ०-[illegible]

भगवी गीता क. यशवंत ०-५-०

वरील सर्व पुस्तकें मुंबई सरक[illegible] मंजूर केलेलीं आहेत.

राजकवि यशवंत

दरोडेखोर ! छे देवदूत ! ०-६-

वि. स. गवाणकर

सुबोध भूगोल (इ. दुसरी) ०-६-

सुबोध भूगोल (इ. तिसरी) ०-५-०

भि. अ. परब

अर्थ-सुबोधिनी ०-६-०

प्रो. धर्मानंद कोसंबी

वेडा इवान ०-८-

फिरोज आनंदकर

वेणीमाधव ०-२-६ राणि ०-२-६

श्वेतकर्ण ०-२-६ नरपति ०-२-६

डायरेक्ट मेथड ०-३-०

आजोबांच्या मुली ०-५-०

नवभारत प्रकाशन संस्था मुंबई ४